**नियमित फौजदारी खटला क्र. ६१/२०२४**

**निशाण क्रमांक २६**

**अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. ०४ चा जबाब शपथेवर सुरु.**

**नाव** – नितीन बाळकृष्ण जाधव,

**वय** – ४४ वर्षे, **व्यवसाय** – नोकरी (पोलीस हेड कॉ./१०२७),

**सध्या नेमणूक** – देवरुख पोलीस ठाणे अंतर्गत साखरपा पोलीस दुरक्षेत्र, जि. रत्नागिरी.

**अभियोगपक्षातर्फे सरतपास विशेष सहा. सरकारी अभियोक्ता गुरुपादगोळ यांचेकडून –**

**०१.** दिनांक १४/०५/२०२४ रोजी मी पोलीस ठाणे देवरुख अंतर्गत साखरपा पोलीस दुरक्षेत्र येथे कार्यरत होतो. त्यादिवशी आदीत्य बळीराम भेरे यांनी दिलेल्या तक्रारीनुसार भा.दं.वि.चे कलम ३२४, ३२३ ५०४ अन्वये, गुन्हा नोंदणी क्रमांक ५६/२०२४ दाखल करण्यात आला होता. सदर गुन्हयाच्या अनुषंगाने घटनेचा प्राथमिक अहवाल नोंदविण्यात आला होता. *(साक्षीदारास घटनेचा प्राथमिक अहवाल दाखविण्यात आला)*. तो तोच आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यावर माझी व फिर्याद देणाऱ्याची स्वाक्षरी आहे. *(सदर दस्तास **निशाणी २७** देण्यात आली)*.

**०२**. फिर्यादी यास औषधोपचार करुन वैद्यकीय प्रमाणपत्र मिळणेबाबत वैद्यकीय अधिकारी यांना पत्र दिले होते. *(साक्षीदारास सदरचे पत्र दाखविण्यात आले)*. ते तेच आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यावर माझी व फिर्यादीची स्वाक्षरी आहे. *(सदर दस्तास **निशाणी २८** देण्यात आली)*.

**०३**. सदरचा गुन्हा देवरुख पोलीस ठाण्यात दाखल झाल्यानंतर, त्याचा तपास लेखी आदेशान्वये माझ्याकडे देण्यात आला. *(साक्षीदारास तपासाचा लेखी*

*आदेश दाखविण्यात आला).* तो तोच आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यावर पोलीस निरीक्षक यांची स्वाक्षरी आहे. सदरचा आदेश मला देण्यात आला असल्याने त्यावरील मी स्वाक्षरी मी ओळखतो. *(सदर दस्तास **निशाणी २९** देण्यात आली).*

०४. त्यानंतर, मी घटनास्थळी दोन पंचांसमक्ष घटनास्थळाचा पंचनामा केला. सदरचे घटनास्थळ मौजे बोंडये, ता. संगमेश्वर जि. रत्नागिरी येथील यशवंत सोमा गुडेकर यांच्या अंगणात होते. गुन्हा नोंदणी क्रमांक ५५/२०२४ मधील घटनास्थळ तेच असल्याने सदर गुन्हयात मी त्यातील फिर्यादीचा फाटलेला बर्मुडा मी जप्त केला होता. प्रस्तुतच्या गुन्हयात फिर्यादी व साक्षीदार यांना मारहान करण्यासाठी वापरण्यात आलेली लाकडी कुदळ व एक टि–शर्ट हा मुद्देमाल जप्त केला होता. *(साक्षीदारास लाकडी कुदळ व एक जप्त टि–शर्ट दाखविण्यात आला). तो तोच जप्त केलेला मुद्देमाल आहे. त्यावर माझी व दोन पंचांची स्वाक्षरी आहे. (लाकडी **कुदळ यास वस्तु – ब व टि–शर्ट या वस्तु – क** देण्यात येते). (साक्षीदारास घटनास्थळ पंचनाम्याची सत्यप्रत दाखविण्यात आली).* ती तीच असुन त्यावर माझी व दोन पंचांची व दोन्ही गुन्हयातील फिर्यादी यांची स्वाक्षऱ्या आहेत. त्यातील मजकुर बरोबर आहे. *(सदर दस्तास **ओळखीकरीता वस्तु – ड** देण्यात येते).*

०५. सदर पंचनाम्यावेळी पो.शि.श्री. तानाजी पाटील यांनी छायाचित्रे घेतली होती. *(साक्षीदारास प्रकरणातील वस्तु – अ कडील छायाचित्रे दाखविण्यात आली).* ती तीच असुन त्यावर माझी व पो.शि.श्री. तानाजी पाटील यांची सही आहे. त्यामध्ये मी, दोन्ही गुन्हयातील फिर्यादी व पंच असे दिसत आहेत. पो.शि. श्री. तानाजी पाटील यांनी त्यांचे भा.पु.का.कलम ६५–ब अन्वयेचे प्रमाणपत्र माझ्याकडे दाखल केले आहे.

०६. सदर जप्त मुद्देमालाची मुद्देमाल पावती तयार करुन पोलीस ठाण्यातील मालखान्यात जमा केला.*(साक्षीदारास मुद्देमाल पावती दाखविण्यात आली).* ती तीच असुन त्यावर माझी व मुद्देमाल स्वीकारणाऱ्याची स्वाक्षरी आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. *(सदर दस्तास **निशाणी ३०** देण्यात आली).*

**०७**. त्यानंतर मी आरोपीला फौ.प्र.सं.कलम ४१–अ–१ अन्वये नोटीस देण्यात आली. *(साक्षीदारास सदरची नोटीस दाखविण्यात आली)*. ती तीच असुन त्यावर माझी व आरोपीची स्वाक्षरी आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. *(सदर दस्तास **निशाणी ३१** देण्यात आली)*.

**०८**. आरोपी तपास कामात हजर झाला असल्याने त्याला त्याची पोहोच पावती देण्यात आली. *(साक्षीदारास पोहोच पावती दाखविण्यात आली)*. ती तीच असुन त्यावर माझी व आरोपीची स्वाक्षरी आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. *(सदर दस्तास **निशाणी ३२** देण्यात आली)*.

**०९**. त्यानंतर, जखमींची वैद्यकीप्रमाणपत्र मिळणेकरीता प्राथमिक आरोग्य केंद्र, साखरपा व चिरायु हॉस्पीटल, रत्नागिरी यांना मी पत्र व्यवहार केला होता. *(साक्षीदारास प्राथमिक आरोग्य केंद्र, साखरपा यांना देण्यात आलेले पत्र दाखविण्यात आले)*. ते तेच असुन त्यावर माझी व वैद्यकीय अधिकारी प्राथमिक आरोग्य केंद्र, साखरपा यांची स्वाक्षरी आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. *(सदर दस्तास **निशाणी ३३** देण्यात आली). (साक्षीदारास 'चिरायु हॉस्पीटल, रत्नागिरी' यांना देण्यात आलेले पत्र दाखविण्यात आले). ते तेच असुन त्यावर माझी व चिरायु हॉस्पीटल, रत्नागिरी' यांची स्वाक्षरी आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. (सदर दस्तास **निशाणी ३४** देण्यात आली)*. त्यानंतर, प्राथमिक आरोग्य केंद्र, साखरपा यांच्याकडुन वैद्यकीय प्रमाणपत्र प्राप्त झाले नसल्याने त्यांना स्मरणपत्र देण्यात आले. सदर दोन्ही दवाखान्यातील जखमींची वैद्यकीय प्रमाणपत्रे प्राप्त करुन ती अभिलेखात सामील केली.

**१०**. चिरायु हॉस्पीटल येथे एमएलसी ची कागदपत्रे रत्नागिरी शहर पोलीस ठाण्याकडुन संगमेश्वर पोलीस ठाण्याकडे पाठविण्यात आली होती. ती कागदपत्रे संगमेश्वर पोलीस ठाण्याकडुन देवरुख पोलीस ठाण्याकडे पाठविण्यात आली. ती कागदपत्र तपासकामी समाविष्ठ करण्यात आली आहेत.

**११.** आरोपीला अटक न करण्याबाबतचे मी न्यायालयात पत्र सादर केली होती. *(साक्षीदारास सदरचे पत्र दाखविण्यात आले). ते तेच असुन त्यावर माझी व सहा. पोलीस निरीक्षक यांची स्वाक्षरी आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. (सदर दस्तास **निशाणी ३५** देण्यात आली).*

**१२.** त्यानंतर, मी साक्षीदारांची तपासटिपणे नोंदविली. *फिर्यादी – आदित्य बळीराम भेरे याचा जबाब मीच नोंदविला होता. त्याच्या जबाबातील चिन्हांकीत भाग अ कडील मजकुर वाचुन मी सांगतो की, ''तो मजकुर मी फिर्यादीच्या सांगण्याप्रमाणेच नोंदविला होता''. सदर जबाबातील चिन्हांकीत **भाग अ यास निशाणी क्रमांक ३६** देण्यात येते).*

**१३.** साक्षीदार – *बळीराम गणेश भेरे व सुनिता सुरेश भेरे यांची तपासटिपणे मीच नोंदविली होती. साक्षीदार – बळीराम गणेश भेरे याच्या जबाबातील चिन्हांकीत भाग अ व ब कडील मजकुर वाचुन मी सांगतो की, ''तो मजकुर मी त्याच्या सांगण्याप्रमाणेच नोंदविला होता''. सदर टिपणातील चिन्हांकीत **भाग अ यास निशाणी क्रमांक ३७ व चिन्हांकीत भाग ब यास निशाणी क्रमांक ३८** देण्यात येते).*

**१४.** *साक्षीदार – सुनिता सुरेश भेरे याच्या जबाबातील चिन्हांकीत भाग अ कडील मजकुर वाचुन मी सांगतो की, ''तो मजकुर मी त्यांच्या सांगण्याप्रमाणेच नोंदविला होता''. सदर टिपणातील चिन्हांकीत **भाग अ यास निशाणी क्रमांक ३९** देण्यात येते).*

**१५.** एकूण तपासावरुन असे दिसून आले की, आरोपीने फिर्यादीस शिवीगाळ करुन लाकडी कुदळीने व हाताने मारहान केल्याचे निष्पन्न झाले. सबब, मी आरोपीविरुध्द दोषारोपपत्र दाखल केले. आरोपीला दाखविल्यास मी ओळखू शकतो. आज रोजी आरोपी न्यायालयात हजर नाही.

**सरतपास पुर्ण.**

**<u>उलटतपास – आरोपीतर्फे विधीज्ञा श्रीमती यु. पी. चव्हाण यांच्याकडून</u> –**

**१६**. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटा पंचनामा केला आहे. हे म्हणणे खरे आहे की, लाकडी कुदळ व टि–शर्ट बाजारात सहज उपलब्ध होणारे आहेत. हे म्हणणे खरे नाही की, लाकडी कुदळ व टि–शर्ट जप्त केल्याचे मी खोटे कथन केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, पो.शि. तानाजी पाटील यांनी तेथे छायाचित्रे घेतल्याचे मी खोटे कथन करीत आहे. हे म्हणणे खरे नाही की, निशाणी क्रमांक ३६ ते ३९ कडील मजकुर फिर्यादी व साक्षीदारांच्या सांगण्याप्रमाणे नोंदविल्याचे मी खोटे कथन करीत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने गुन्हयाचे कोणतेही कृत्य केले नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीविरुध्द खोटेच दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत,

ROHINI RAJENDRA KULKARNI
Digitally signed by ROHINI RAJENDRA KULKARNI
Date: 2026.03.11 14:47:32 +0530

**(रोहिणी आर. कुलकर्णी)**

दि. १०.०३.२०२६ न्यायदंडाधिकारी वर्ग–१ देवरुख,

स्थळः देवरुख जि. रत्नागिरी.

-:CERTIFICATE:-

I affirm that the contents of this Pdf file evidence are same words as per original Judgment/order/evidence.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | S. A. Bhale |
| Court Name | :- | The Court of Civil Judge (J.D.) & Judicial Magistrate F.C., Deorukh |
| Date of decision | :- | 10/03/2026 |
| evidence signed by PO. on | :- | 10/03/2026 |
| evidence uploaded on | :- | 10/03/2026 |